पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर जिल्हा(ग्रामीण),
**PhNo. 0712 -2560200, Fax No. 2560779**
**e-mail ID sp.nagpur.r@mahapolice.gov.in**

---

## डॉक्टर, नर्स, फार्मासिटीकल्स, रूग्णवाहीका, आरोग्य विभागाशी निगडीत अधिकारी व कर्मचारी आणि इतर वैद्यकीय सुविधा पुरविणा—यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस विभागातर्फे हेल्पडेस्क व हेल्पलाईन नंबर सुरू करण्यात आले आहेत.

————○○○○————

नागपूर ग्रामीण जिल्हयात **Corona Virus** (**COVID 19)** या विषाणुचा संसर्ग टाळण्याकरीता मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे आदेशान्वये संचारबंदी, जमावबंदी लागु करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक २५/०३/२०२० पासून संपुर्ण देशभरात २१ दिवस लॉकडाऊन करण्यात आले आहे.

उपरोक्त आदेशानुसार पोलीस, आरोग्य विभाग, अत्यावश्यक सेवा, जीवनावश्यक वस्तू, आपत्ती व्यवस्थापन, प्रसारमाध्यम व त्यांचे प्रतिनीधी (फक्त कर्तव्यार्थ) यांचेशी निगडीत आस्थापनामध्ये कामकाज करणारे अधिकारी व कर्मचारी यांना आदेशातुन त्यांचे कर्तव्यावर प्रवास करण्यास परवानगी असल्याचे नमुद आहे.

डॉक्टर, नर्स, फार्मासिटीकल्स, रूग्णवाहीका, आरोग्य विभागाशी निगडीत अधिकारी व कर्मचारी आणि इतर वैद्यकीय सुविधा पुरविणा—यांना नागपूर ग्रामीण जिल्हयात कर्तव्य बजावितांना कोणत्याही प्रकारचा त्रास होवू नये यासाठी पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण कार्यालयामार्फत हेल्पडेस्क व हेल्पलाईन नंबर सुरू करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने नागपूर ग्रामीण जिल्हयातील सर्व वैद्यकीय सेवा पुरविणा—या नागरीकांना कळविण्यात येते की, आपणास कर्तव्य बजावतांना कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास नागपूर ग्रामीण पोलीसांतर्फे सुरू केलेल्या खालील हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा.

- **संपर्क /WhatsApp Number - 9049442277**